MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

Special Issue February 2019
Peer Reviewed International Refereed Research Journal

# VIDYAWARTA®

Special Issue – Vol. II



# VIMUKTA - NOMADIC CASTES – TRIBES & OTHER BACKSWORD CLASS: PRESENT CONDITIONS, DEVELOPMENT & CHALLENGES.

Guest Editor

Dr.B.K.Shep
Dr.R.D.Rathod
Dr.K.M.Bhange

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318

Vidyawarta®
Peer-Reviewed International Publication

February 2019
Special Issue-02



28) [illegible], उपेक्षित व लोकनेते गोपीनाथराव मुंडे
डॉ. प्राचार्य विठ्ठल घुले & प्रा. मुंडे दत्तात्रय रामकिशनराव, परळी वैजनाथ ||71

29) भटक्या-विमुक्त जमातींचे पारंपरिक जीवन व आव्हाने
डॉ. देवषी मुकुंद अरविंदराव, अंबाजोगाई ||74

30) वसंतराव नाईक यांच्या क्रांतिकारक आणि प्रभावी कार्याचा समाजशास्त्रीय अभ्यास
प्रा. डॉ. साहेबराव हिवाळे, वैजापूर ||76

31) महाराष्ट्रातील वंजारी जातीची सद्यःस्थिती आणि आव्हाने
प्रा.डॉ.गुट्टे पंढरी व्यंकटी, परळी-वैजनाथ जि.बीड ||80

32) भटक्या विमुक्त जाती जमातीच्या सामाजिक समस्या : एक दृष्टीक्षेप
प्रा.डॉ.आनेराव एम.एम., सोनखेड ||82

33) भटक्या विमुक्त वडार जमातीच्या सामाजिक समस्यांचे समाजशास्त्रीय अध्ययन
प्रा.डॉ.पांडुरंग रा. मुठे, शिरुर अनंतपाळ, जि.लातूर ||84

34) महाराष्ट्रातील आदिवासी समाजाची न्यायव्यवस्था:— ऐतिहासिक अभ्यास
प्रा.डॉ. दत्तात्रय रामचंद्र डुबल, सोमेश्वरनगर ||87

35) मुस्लिम वेलदार भटकी जमात
प्रा.डॉ. सय्यद मुजीब मुसा, बिडकीन, ता. पैठण, जि. औरंगाबाद ||91

36) महाराष्ट्रातील वंजारी समाजाचा सांस्कृतिक इतिहास
प्रा. डॉ. प्रकाश फड, परळी—वै. ||93

37) गोंड जमातीची सदयस्थिती
डॉ. काळे बी.एम., सोनपेठ जि. परभणी ||96

38) भटक्या—विमुक्तजमातींचेस्वरूप व सध्यस्थिती
डॉ.देविदास पांडूरंग खोडेवाड, अंबाजोगाई ||98

39) महाराष्ट्रभातील भटक्या विमुक्त जाती — जमाती व इतर मागासवर्गीय सद्यस्थिती
प्रा.डॉ. विजय दि. पोकळे, कडा, ता. आष्टी, जि. बीड ||99

40) ग्रामीण भागातील अनुसूचीत जाती—जमातीतील महिलांच्या समस्या व शासनाची भूमिका
प्राचार्या डॉ. जयश्री देशमुख, वाशिम ||102

41) महाराष्ट्रातील भटक्या विमुक्त जाती-जमातीचा अभ्यास
प्रा. पोपळघट आर. एस., पाथ्री ता. फुलंब्री जि. औरंगाबाद ||104

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318 | Vidyawarta® Peer-Reviewed International Publication | February 2019 Special Issue-02 

37

# गोंड जमातीची सदयस्थिती

**डॉ. काळे बी.एम.**
सहयोगी प्राध्यापक,
कै. रमेष वरपुडकर महाविदयालय, सोनपेठ जि. परभणी

**********

'जातीयता' हे भारतीय समाजाचे प्रधान लक्षण आहे. या देशात विविध जाती व जमातीचे लोक राहतात. ६ हजारोंपेक्षा जास्त जातीया देशात आढळून येतात, या जातींबरोबरच अनेक जमाती पण आहेत. या जमातींना आपण अदिवासी म्हणून ओळखतो. आदिपासून किंवा सुरूवातीपासूनच द—याखो—यात किंवा जंगलात निवास करणारे लोक म्हणजे आदिवासी होय. त्यामुळे जंगलात किंवा डोंगराळ भागात राहणा—या लोकांना आदिवासी असे संबोधले जाते. डॉ. व्हेरियर इक्वीन आणि ठक्कर बापा यांनी आदिवासींना मुळचे निवासी अर्थातच मुळ निवासी असे म्हटले आहे. आणि ते यथार्थ आहे. त्यांचा आणि हिंदु धर्माचा, सांस्कृतीचा काडी मात्रही संबंध नाही. त्यांची जीवनमुल्ये आणि जीवन प्रेरणा स्वतंत्र आहे. त्यांना कोणी आपल्या सोईप्रमाणे गृहित धरू नये. उषा किरण आत्राम परिवर्तन या कवितेत म्हणतात.

मक्तेदारी चालनार नाही !
ब्राम्हणशाही चालणार नाही!
आम्ही नाहीत हिंदू!
आम्ही आहोत कोयतुर!
आमचा प्रकाश आम्हीच होउ!
परप्रकाशी कधी न राहू!
गोंडवाणा जागवा परकियांना भागवा.

आदिवासी आपल्या अस्मिततेची जाणीव झाली आहे. नागर समाजाची बनवाबनवी त्यांच्या लक्षात आली आहे. त्यांना पुर्वजांनी दाखवून दिलेल्या मार्गाने ती जीवन प्रवास करीत आहेत. त्यांना त्यांच्या पुर्वपरंपरेचा अभिमानस्पद समृध्द वारसा आहे. राणी दुर्गावती, राणी हिराई, रावण, एकलव्य, बिरसा मुंडा, बाबुराव रोडमाळे. भिल्ल इ. प्रेरक वारसा त्यांना लाभलेला आहे.

१९५० ला एकुण १४ राज्यात २१० अदिवासी जमाती होत्या नंतर ती संख्या ५५० वर गेली, आदिवासीची एकुन संख्या ८ कोटी आहे. महाराष्ट्रात आदिवासीची संख्या सुमारे १ कोटी आहे, महाराष्ट्रात एकुन ४७ जमाती सहयाद्री विभाग, सातपुडा, विदर्भातील डोंगराळ भाग व जंगलमय प्रदेशात राहतात त्यात महादेव कोळी, वारली, कोकणा, ठाकर, कातकरी, मल्हार कोळी, भिल्ल, कोरकु, धानका, तडती, पावरा, गोंड, वारली, कोलाम, प्रधान, अंध या प्रमुख जमातींचा समावेश आहे.

यापैकी विदर्भातील 'गोंड' ही प्रमुख आदिवासी जमात आहे. हे लोक चंद्रपुर, गडचीरोली, यवतमाळ व नादेड जिल्हयात सर्वात जास्त आहेत. महाराष्ट्रातील आदिवासी लोकसंख्येत गोंड जमातीची लोकसंख्या तीस—या क्रमांकावर आहे महाराष्ट्राप्रमाणेच मध्यप्रदेश उडीसा, बिहार, कर्नाटक व गुजरात राज्यात देखील या जमातीचे लोक आहेत. विदर्भातील ही एक प्रमुख जमात असुन गडचीरोली आणि चंद्रपुर जिल्हयात या जमातीची लोकसंख्या अधिक आहे. त्याखालोखाल यवतमाळ आणि नागपुर मध्येही या जमातीचे लोक आढळतात.

'गोंड' या शब्दाचा अर्थ 'जंगलात राहणारा' असा आहे. गोंड लोक स्वत:ला 'कोया' किंवा 'कोईतुर' म्हणणे अधीक पसंत करतात. मानव शास्त्रज्ञ माननीय. हिस्लॉप यांच्या मते 'गोंड' शब्दाची उत्पती तेलगु भाषेतील 'कोंड' शब्दापासुन झाली. 'कोंड' शब्दाचा अर्थ 'पर्वत' असा आहे. पुर्वी 'गोंड' जमातीचे लोक पर्वतावर किंवा पर्वताच्या पायथ्याशयी वास्तव्य करायचे म्हणुन या लोकांना 'कोंड' म्हटल्या जायचे 'कोंड' या शब्दाचा अपभ्रंश 'गोंड' असा झाला असावा. गोंड हे द्रवीड वंशाचे असल्याचे मत रसेल आणि हिरालाल यांनी मांडले आहे. गोंड जमातीचे अनेक उपजमातीमध्ये विभाजन झालेले आहे. राजगोंड, नाईकगोंड, खातेलागोंड, माडीयागोंड, इत्यादी.

पुर्वी 'गोंड' लोक हे राजे होते. भारतात गोंड — द्रविडांची मोठमोठी नगरे होती. चंद्रपुर, भंडारा, नागपुर या विभागाला गोंडवाणा असे नाव होते. चंद्रपुर, नागपुर येथे गोंड लोकांचे राज्य होते नागपुरमध्ये भोसल्यांची सत्ता प्रस्थापीत होण्यापुर्वी गोंड राजा राज्य करीत होता. गोंड राज्याचे १७५१ पर्यत राज्य होते. नागपुर येथे गोंडाचा किल्ला आहे. चंद्रपुर येथे गोंडाच्या किल्याचे अवशेष आहेत. आर्यांच्या आगमनामुळे गोंड द्रविडांची संस्कृती नष्ट झाली आणि गोंड लोक आपल्या बचावासाठी जंगलात गेले. आज जरी गोंड लोक हे आदिवासी असले तरी ते ऐकेकाळी राज्यकर्ते होते. गोंड जमातीत पितृसत्ताक कुटुब पध्दती आढळते. त्यांच्यात एक विवाह व बहुपत्नीत्वाची पध्दत आढळुन येते वस्तुच्या स्वरूपात वधुमुल्य देवुन विवाह केला जातो. तसेच विधवा विवाहाला मान्यता दिली जाते. यांच्यात घटस्फोट होण्याची पध्दत असुन त्याला पंचायतीची परवानगी घेणे आवश्यक आहे. या जमातीत प्रामुख्याने ४ कुल गट दिसुन येतात. कुल गटात ते विवाह न करता दुस—या कुल गटासोबत विवाह करतात. प्रत्येक कुळाचे एक कुलचीन्ह असुन ते अंगावर गोंदवुन घेतात. या जमातीत 'युवागृह' असते यात तरून मुले मुली एकत्र येतात. परस्परांच्या स्वभावाची ओळख पटल्यानंतर एकमेकांसोबत काही काळ घालवल्यानंतर ते जीवन साथी निवडतात. ते निर्सगाच्या सानीध्यात राहत असल्याने ते निर्सग पुजक आहेत. पर्वत, नदि, चंद्र, सुर्य इ. पुजा करातात. त्यांचा जादु, मंत्रतंत्रावर विश्वास आहे. त्यांच्यात स्वतंत्र अशी न्यायव्यवस्था असुन ते काम पंचायतीद्वारे

केल्या जाते. पंचायतीचा निर्णय मान्य करावा लागतो. पंचायतीच्या निर्णयाची अवहेलना करता येत नाही. नियमांचा भंग केल्यास वहीष्कार, दंड आणि गावभोजन इ. शिक्षा भोगाव्या लागतात.

जल, जंगल आणि जमीनीच्या आधारे जगत असलेल्या 'गोंड' जमाती समोर आज अनेक समस्या उभ्या राहत असल्यामुळे अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण या मूलभुत सुविधा पासुन कोसो दुर आहेत. जंगलात रस्ते नाहीत. पीण्यासाठी पाणी नाही, आरोग्याच्या सुवीधा नाहीत, कुपोषणाने अनेकांचे बळी जात आहेत. त्यामुळे बाबाराव मडावी सारख्या आदिवासी कवीने 'कुपोषण' सारखा प्रश्न मांडला आहे.

कसा खाईल चार घास
जंगलाची संपत्ती सरकारच्या दरबारात
भांडवलदाराच्या घरात
आदिवासी मृत्युच्या दारात
पोरग कुपोषणान घेरलं
कोवळया जीवाले
कोणी कसं मारलं.!

या भुमीचे भुमीपुत्र असलेल्या आदिवासीच्या वाटयाला आलेले दारीद्रय व कुपोषण याचे चित्र अनेक कवीने मांडले आहे. जंगल व दुर्गम भागात कोणत्याच सुवीधा नसल्यामुळे त्यांचे जीवन अत्यंत हालाखीचे आहे.

गडचीरोली जिल्हयातील माडीया गोंडापुढे उपजीवीकेची मुलभुत समस्या निर्माण झाली आहे. शासनाच्या जंगलविषयक धोरणामुळे त्यांच्या उपजीवीकेच्या पारंपारीक व्यवसायावर निर्बंध टाकण्यात आले आहेत. त्यामुळे उदरनीर्वाह कसा करावा हा फार मोठा प्रश्न त्यांच्यापुढे निर्माण झाला आहे. त्यांना वर्षभर काम मीळत नाही. जंगलातुन तेंदुची पाने गोळा करणे, बांभु कटाई तसेच जंगलातील वस्तु गोळा करण्याचे कामे ते करतात. ठेकेदार, शासकीय अधीकारी, कर्मचारी त्यांचे शोषण करतात. त्यातच नक्षलवाद फार मोठया प्रमाणात वाढी लागली आहे. विदर्भातील चंद्रपुर अणि गडचीरोली जिल्हयात नक्षलवादाचे मोठे प्रस्थ आहे. सुरवातीला नक्षलवाध्यावीषयी आदिवासीच्या मनात आपुलकी निर्माण झाली होती कारण आदिवासीच्या शोषणा विरूध नक्षलवादी संघर्ष करत होते. त्यामुळे अनेक गोंड आणि माडीया गोंड जमातीचे तरून—तरूनी नक्षलवादी चळवळीत सक्रीय झाले आहेत. आदिवासीच्या मन:त नक्षलवाध्यांवीषयी प्रचंड दहशद आहे. पोलीस आदिवासींकडे नक्षलवादाचे सर्मथक म्हणुन बघतात. त्यांचे संरक्षण करण्याऐवजी त्यांचे शोषण करतात. नक्षलवादामुळे गोंडाचे प्रचंड शोषण होत असुन ते विकासाच्या प्रक्रीयेपासुन वंचीत राहीले आहेत.

हे जरी खरे असले तरी समाधानाची बाब ही आहे की आज काही आदीवासीची मुले शिकले आहेत. त्यांच्या अस्मीतेची जाणीव निर्माण झाली आहे. मनुष्य हिताची नवी वैचारीक भूमीका घेउन ते लढत आहेत. चळवळ करत आहेत. चळवळ कशाला म्हणतात हे सांगताना वाहरू सोनवणे म्हणतात.

चळवळ म्हणजे काही,
दोन पाच दिवसांची जत्रा नव्हे,
चळवळ म्हणजे माणुसकीचा गाभा
सतत विकसीत होत जाणारा प्रवाह.

आशा ओळीतून चळवळीचे नुसते सुरच मांडते नाहीत तर आदीवासींना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी ते धडपडत आहेत. डॉ. मधुकर वाकोडे, डॉ. अनिल सहस्त्रबुध्दे, उषा किरण अत्राम, सुरेशा खादशिवार, वाहरू सोनवणे, बाबुराव मढावी, भुजंग मेश्राम, माधव सरकुंडे इ. नी आदिवासींच्या प्रश्नांना चळवळीद्वारे व लेखनीद्वारे वाचा फोडली आहे. आदिवासींची मुले शिल्यामुळे त्यांच्यात स्व ची जाणीव झाली आहे. त्यांचे स्वतंत्र साहित्य संमेलन भरत आहे. त्यांच्या पूर्वजांनी दाखवून दिलेल्या मार्गाने ते जीवनप्रवास करत आहेत. माधव सरकुंडे सारखा कवि इतिहासाचे पुनलेखन झाले पाहिजे ही भावना व्यक्त करतो तो म्हणतो.

गुरूजी!
आत्त आम्हीच लिहु आमचा इतिहास
या डोंगराच्या पाठीवर
अन जगाला सांगू
विरसाचे उलगुलान
गुंडाधुरचा स्वातंत्र्य संग्राम
सिंधु, कान्हा, तान्हा, तंटया, खाज्याच्या
ज्वालामुखी हुंकारांनी मढवू
आम्ही आमचे भविष्य

आदिवासीच्या शौर्याची नोंद इतिहासाने आतापर्यंत घेतली नसल्याचा सवाल कवीने व्यवस्थेसमोर उपस्थित केला असून, आता आपला इतिहास आपणच मांडण्याची उर्मी कविने व्यक्त केली आहे.

आज नागरी जीवनाचा काही प्रमाणात संपर्क आल्यामुळे बाहय लोकांचा त्यांच्यावर प्रभाव पडत आहे. त्यामुळे त्यांची मुळ संस्कृती लोप पावत आहे. निसर्गसन्मुख जीवन जगणारा हा समुह शासनाच्या धोरणामुळे उदधवस्त होउ पाहत आहे.जल, जंगल आणि जमिनीच्या आधाराने जगत होता ते घटकच त्यांच्यापासून हिरावून घेणे हे घातक आहे. आजही आदिवासी माणसांचा भारतीय नागरीक म्हणून सन्मान केला जात नाही ही वस्तुस्थिती आहे. त्यांचे अधिकार, हक्क मान्य करण्याऐवजी, त्यांना विकासाची संधी देण्याऐवजी, त्यांना विकासापासून कोसोदुर ठेवण्याचा प्रयत्न केला जात आहे आणि ते लोकशाही साठी घातक आहे.

**संदर्भग्रंथ :—**

१. महाराष्ट्रातील आदिवासी जमाती:— गोविंद गारे
२. आदिवासी समाजाचे समाजशास्त्र — डॉ. प्रदीप आगलावे
३. महाराष्ट्रातील आदिवासीचे लोकसाहित्य — डॉ. शैलेजा देवगांवकर



Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani
PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani